# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ०८/०२/२०१९ रोजी (का.प.क्र.२२) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

शुक्रवार दिनांक ०८/०२/२०१९ रोजी (का.प.क्र.२२) मा.सभापती श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलिक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी ११:३५ वाजता वंदेमातरम् या गिताने सुरु झाली. सभेला मा.अतिरिक्त आयुक्त-२ (श्री.संतोष कवडे), नगर सचिव,श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
०२. स.स.श्री.ऋषीकेश चंद्रकांत खैरे
०३. स.स.श्री.सिध्दांत संजय शिरसाट
०४. स.स.श्रीमती राखी प्रशांत देसरडा
०५. स.स.श्रीमती शेख नरगीस सलीम
०६. स.स.श्री.रूपचंद लक्ष्मण वाघमारे
०७. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे
०८. स.स.श्रीमती खान सायराबानो अजमल
०९. स.स.श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी
१०. स.स.श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखान
११. स.स.श्रीमती शिल्पाराणी सागरअप्पा वाडकर
१२. स.स.श्री.अब्दुल नविद अब्दुल रशीद

मा.सभापती : घनकचरा व्यवस्थापक आणि पाणी पुरवठा विभाग या दोन्ही विभागातील सर्व अधिकाऱ्यांनी ही बैठक संपल्यानंतर पाणी पुरवठा आणि स्वच्छता या दोन्ही विषयावर मा.महापौर दालनात मा.महापौरांच्या अध्यक्षतेखाली सर्व विभाग प्रमुख, पदाधिकारी आणि नगरसवेकांच्या उपस्थितीत बैठक होणार आहे. याची नोंद घ्यावी. व बैठकीस संबंधीत अधिकारी यांनी हजर रहावे.

श्रीमती.जयश्री कुलकर्णी : अशोक नगर, शिवनेरी कॉलनीतील दुषित पाण्याचा प्रश्न गेल्या चार बैठकीपासुन सांगत आहे. प्रश्न सोडवण्यात आलेला नाही. काम चालु आहे परंतु फॉल्ट सापडलेला नाही. आणि त्रिमुर्ती चौकातील सुलभ शौचालय सुध्दा चालु झालेले नाही.

कार्य.अभियंता(ड्रेनेज) : सीएसआर फंडातुन शौचालय सुरु करण्यात आले आहे. तिथे फक्त पाण्याची कमतरता आहे. टॅकरने पाणी चालु आहे. सध्या स्थितीमध्ये शौचालय चालु आहे. बीओटीचे पाच आहेत ते सुध्दा चालु आहे.

मा.सभापती : या पाच एजन्सीला मुख्य जलवाहिनीवरुन कनेक्शन दिले आहे का?

कार्य.अभियंता(ड्रेनेज) : मुख्य लाईनवर नाही परंतु त्यांना नळ कनेकशन दिलेले आहे.

मा.सभापती : या पाच लोकांनी नळाचे टॅक्स भरलेले आहेत का? किती दिवस झाले याबाबत पाणी पुरवठा विभागाला सुचना दिल्या आहेत. योग्य कार्यवाही करावी.

कार्य.अभियंता(पा.पु) : तीन चार वर्षापुर्वी याबाबत वार्डला कळविलेले आहे.

मा.सभापती : चार वर्षापासुन हे लोक एक रुपये सुध्दा महापालिकेला भरत नाही. या महिन्यामध्ये त्यांनी पैसे भरले पाहिजे अन्यथा नळ कनेक्शन कट करण्यात येईल अशी सुचना देण्यात यावी.

श्रीमती.शेख नरगीस : केजीएन हॉस्पिटलचे काम लवकरात लवकर सुरु करण्यात यावे. कुत्रे पकडण्यासाठी पुण्यातील ब्ल्यु क्रॉस एजन्सीला कॉन्ट्रॅक्ट देण्यात आले होते. एजन्सीने वेळेच्या आत काम केले आहे. एजन्सीला पेमेंट देण्यात आलेले नाही.

मुख्य लेखाधिकारी : बिल प्रोसेसमध्ये आहे, सहीसाठी पाठवलेले आहे.

मा.सभापती : बील मंजुर करावे.

| | |
|---|---|
| मा.सभापती | : मागच्या महिन्यामध्ये उपमुख्य लेखा परिक्षक यांच्या बाबत पत्र काढले होते त्या आदेशाची पुर्तता झाली का? |
| मुख्यलेखा परिषक | : नियमाप्रमाणे उपमुख्य लेखा परिषक यांना २४ तासाच्या आत कार्यालयात पुर्ण वेळ काम करण्यासाठी नोटीस दिलेली आहे. |
| श्री.गजानन बारवाल | : श्री.पाटणी यांना याबाबत विचारण्यात यावे. |
| श्री.पाटणी | : माझे मुख्य पद उपमुख्य लेखा परिषक आहे आणि या पदावर मी रुजू आहे व काम सुध्दा करत आहे. |
| श्री.गजानन बारवाल | : मागच्या बैठकीमध्ये आदेश देण्यात आले होते. त्याची माहिती आहे का? |
| मा.सभापती | : मुख्य लेखा परिषक यांनी पत्र दिले होते की, आपण मुळ विभागात रुजु व्हावे. त्याचे काय झाले. |
| श्री.गजानन बारवाल | : मा.सचिव यांनी यासंदर्भातील नियम वाचुन दाखवावे. |
| मा.नगर सचिव | : ५१.(१) स्थायी समिती अनुक्रमे नगरपालिका मुख्य लेखापरीक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष हाताखाली नेमावयाचे लेखापरीक्षक, सहायक लेखापरीक्षक, अधिकारी, लिपीक व कर्मचारी यांची संख्या, पदनाम, श्रेणी, वेतन, फी व भत्ते स्थायी समिती पोट-कलम (४) च्या तरतुदींच्या अधीन, वेळोवेळी ठरवील.<br>(२) आयुक्ताने वेळोवेळी एक विवरणपत्र तयार करुन ते स्थायी समितीपुढे मांडले पाहिजे व त्यात त्याच्या मते जे अन्य अधिकार व कर्मचारी ठेवणे आवश्यक आहे त्यांची संख्या, पदनामे व श्रेणी आणि त्या प्रत्येकास जे वेतन, फी व भत्ते देण्याची त्याने सूचना केली असेल त्यांची रक्कम व स्वरुप नमूद केले पाहिजे. |
| श्री.गजानन बारवाल | : याबाबत सविस्तर खुलासा विधी सल्लागार यांनी करावा. |
| विधी सल्लागार | : पोट कलम १ मध्ये अन्यतः तरतुद केली असेल तर नगरपालिक मुख्यलेखापरिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्येक्ष नियंत्रणाखाली नगरपालिका अधिकारी व कर्मचारी त्यांची नेमणुक करण्याचे अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समिती मान्यता मिळवण्याच्या अधिन यथा स्थित नगरपालिका मुख्यलेखापरिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहीत असेल. मात्र कोणत्याही विशिष्ट प्रकरणात किंवा प्रकरणाच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही असे उच्च समितीने ठरवले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही. |
| मा.सभापती | : जे काही करायचे असेल ते स्थायी समितीच्या समोर ठेऊन मान्यता घेऊन केले पाहिजे. सुचना करण्यात येते की, शासनाने दिलेल्या नियमानुसार मुंबई महापालिका अधिनियमानुसार जर कुठे कायद्याची पायमल्ली करत असाल तर ते योग्य होणार नाही. प्रशासनाचे प्रमुख म्हणुन आयुक्त म्हणुन आपली जबाबदारी आहे. |
| श्री.गजानन बारवाल | : सिध्दार्थ गार्डनला लागुन जे पार्किंग आहेत त्याची सविस्तर माहिती आता पर्यंत देण्यात आलेली नाही. |
| मा.सभापती | : श्री.खमर यांनी याबाबत माहिती द्यावी. |
| उपअभियंता(श्री.खमर) | : हे प्रकरण बीओटी विभागाशी संबंधीत आहे. तीन महिन्या पुर्वी मा.आयुक्तांनी बीओटीचे काम माझ्याकडुन काढुन घेतले आहे. २०१४ मध्ये पार्किंगचे टेंडर काढले होते. यामध्ये तीन वर्षासाठी श्री.उस्मान खाजा यांनी १४ लाख ४० हजार रु. टेंडर आणि १ लाख ८० हजार टॅक्स भरलेले आहे. बाकी असलेले दोन वर्षाचे भाडे भरण्यासाठी त्यांना पत्र दिलेले आहे. |
| मा.सभापती | : मागील दोन वर्षापासुन त्यांनी पैसे भरलेले नाही यावर काय कारवाई करणार आहे. |
| मालमत्ता अधिकारी | : लवकरात लवकर पैसे भरले नाही तर त्यांना व्याज लावुन भाडे आकारण्यात येईल. |
| मा.सभापती | : आठ दिवसाच्या आत पैसे व्याजासह वसुल करावे अन्यता टेंडर रद्द करण्यात यावा. |

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : पार्किंगच्या संदर्भात जी समिती गठीत झालेली आहे. समितीने काय निर्णय घेतलेला आहे. आणि स्वच्छतागृहाचे काय झाले.

विधी सल्लागार : जी सहा लोकांची टिम होती त्याचा रिपोर्ट श्री.देशमुख घेऊन गेले आहेत. मा.कोर्टामध्ये सहा टिमचा रिपोर्ट सादर करण्यात आला आहे आणि त्या सोबत स्वच्छतेचा सुध्दा अहवाल देण्यात आलेला आहे.

मा.सभापती : जो अहवाल सादर केला आहे त्याची प्रत देण्यात यावी.

श्रीमती.राखी देसरडा : एमजीएम समोरील हॉटेलच्या सर्व खुर्च्या बाहेर रस्त्यावर आल्या आहे. टपऱ्या सुध्दा आहेत. कायद्यामध्ये तरतुद आहे की, जिथे शिक्षण संस्था आहे तिथे टपऱ्या वगैरे नाही पाहिजेत. खुप मोठे अतिक्रमण झाले आहे.

कार्य. अभियंता(अति) : याबाबत नोंद घेतलेली आहे. तातडीने कार्यवाही करतो.

श्री.ऋषिकेश खैरे : समर्थनगर मध्ये तीन हॉल आहेत. गेल्या कित्येक वर्षापासुन ते बंद आहेत. तेथील नागरीक म्हणतात की, माझी जागा आहे, दुसरा म्हणतो माझी जागा आहे. नेमकी ती जागा कोणाची याचा खुलासा करावा. हे प्रकरण मा.कोर्टामध्ये आहे.

विधी सल्लागार : जागेसाठी प्रकरण कोर्टामध्ये चालु आहे. श्री.मोहन बोंबले याचे जागेसंदर्भात टायटलसाठी आणि श्री.देशमुख यांचे भिंतीसाठी प्रकरण चालु आहे.

ऋषिकेश खैरे : नगरपालिकेपासुन ओपन स्पेस आहे. विधी विभागाकडुन मा.कोर्टामध्ये या गोष्टी प्रॉपर झालेल्या नाही.

मा.सभापती : मा.कोर्टामध्ये कोणते वकील प्रकरण बघत आहे.

विधी सल्लागार : २०१० मध्ये हे दोन्ही प्रकरण श्री.नेहरी यांना दिलेले आहे. तेव्हा पिआर कार्डवरुन नाव कमी झाले होते. यावर फसवणुन केली म्हणुन श्री.गुणवानी आणि श्री.सोळुंके विरुध्द केस केली होती.

श्री.ऋषिकेश खैरे : ती जागा श्री.गुणवानी यांची आहे की, पीठाची जागा आहे की नागरीकांची जागा आहे. तिथे पीठाचा बोर्ड लावलेला आहे.

विधी सल्लागार : पुढच्या सभेमध्ये पुर्ण सविस्तर माहिती सदस्यांना देण्यात येईल.

मा.सभापती : येणाऱ्या बैठकीत सविस्तर माहिती देण्यात यावी.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : गजानन नगरची जागेला पीआर कार्डवर लावायचे होते त्याचे काय झाले?

मालमत्ता अधिकारी : पीआर कार्डवर लावण्यासाठी नगररचना विभागाकडे दिले आहे.

मा.सभापती : लवकरात लवकर ते काम झाले पाहिजे.

**विषय क्र. २१५ :**

विषय : अग्निशमन विभागासाठी एक्स-टाईप फायर वॉटर टेंडर्स (०५ नग) खरेदी करणेसाठी मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव ठेवावयाचा प्रस्ताव.

संदर्भ : Tender ID- 2018-AMCA-353402-1

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | विभाग प्रमुख (यांत्रिकी) |
| २ | कामाचे स्वरुप | महानगरपालिकेने पुरवठा केलेल्या १६ जीव्हीडब्ल्यु चेसीसवर एक्स-टाईप फायरवॉटर टेंडरची उभारणी करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय,<br>मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.९८१ दि.२०/०४/२०१७ अन्वये रूपये २,६६,८५,०००/- रक्कमेचे पुर्वगणकपत्रक मंजूर आहे. |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | रूपये १,८६,५७,७३५/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | (www.mahatenders.gov.in) या वेबसाईटवर प्रसिध्दीचा दि.२५/०९/२०१८ दै.पुण्यनगरी व दै.सांजवार्ता वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्दी दि.२६/०९/२०१८ |

| | | |
|---|---|---|
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | २३/१०/२०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | २५/१०/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | ०४ |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा कमी/जास्त | |
|---|---|---|---|---|
| | | | रक्कम रूपये | टक्केवारी |
| ०१. | मे.हायटेक सर्व्हिसेस, पुणे | २,३४,००,०००/- | रू.४७४२२६५/-जास्त | २५.४२ टक्के जास्त |
| ०२. | मे.हायटेक इंजिनिअर्स मुंबई | २,४५,६०,५००/- | रू.५९०२७६५/- जास्त | ३१.६४ टक्के जास्त |
| ०३. | मे.वाडीया बॉडी बिल्डर्स, अहमदाबाद | २,५३,१४,०००/- | रू.६६५६२६५/- जास्त | ३५.६८ टक्के जास्त |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | विभागीय आपत्कालीन व्यवस्थापन केंद्र |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय. |

वरीलप्रमाणे महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी एक्स-टाईप फायर वॉटर टेंडर्स उभारणी करून देण्यासाठी मे.हायटेक सर्व्हीसेस, पुणे यांनी प्रति नग रूपये ४६,८०,०००/- दराने एकूण रूपये २,३४,००,०००/- रक्कमेची निविदा सादर केली आहे. सदरील निविदेचे अंदाजपत्रक जीएसटी करप्रणाली लागु होण्यापूर्वीचे असून, जीएसटीमुळे दरात ४.५ टक्के वाढ झालेली आहे. तसेच या वाहनात एलईडी इंडिकेटर्स, ईलेक्ट्रॉनिक कंट्रोल पॅनल, लॅडरबिन गॅन्ट्री ही आधुनिक यंत्रसामुग्री बसविण्यात येत असल्यामुळे सर्वच निविदाधारकांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दर भरले आहेत. मे.हायटेक सर्व्हीसेस, पुणे यांनी दिनांक २९/०१/२०१९ रोजी निविदा समिती समोर केलेल्या वाटाघाटीअंती प्रति फायर टेंडर रूपये ३,०५,०००/- प्रमाणे एकूण रूपये १५,२५,०००/- दर कमी करण्यास सहमती दर्शविली असून, वाटाघाटीअंती कमी करण्यात आलेले प्रति फायर टेंडर दर रूपये ४३,७५,०००/- प्रमाणे ०५ नग फायर टेंडर्स करीता एकूण रूपये २,१८,७५,०००/- हे बाजारभावातील दराशी सुसंगत असल्यामुळे योग्य आहेत. त्यामुळे या दरास मा.स्थायी समिती सभेची मान्यता मिळणेसाठी शिफारस करण्यात येत आहे.

सदरील ०५ नग फायर वॉटर टेंडर्स (एक्स-टाईप) ची उभारणी करण्यासाठी १६ जीव्हीडब्ल्यु क्षमतेच्या अशोक लिलॅन्ड कंपनीच्या चेसीस जीईएम (गव्हर्मेंट ई मार्केट) पोर्टल या शासकीय संकेत स्थळावरून खरेदी करण्यात येतील. सद्यस्थितीत जीईएम पोर्टलवर अशोक लिलॅन्ड कंपनीची १६ जीव्हीडब्ल्यु ४३३० मीमी व्हीलबेसची चेसीस प्रतिनग रूपये १६१४१५७/- दराने उपलब्ध आहे. वास्तविक खरेदीच्यावेळी जी शासकीय किंमत असेल त्याप्रमाणे रक्कम आरटीजीएसद्वारे अथवा चेकद्वारे अदा करून चेसीस खरेदी कराव्या लागतील.

करीता ०५ नग एक्स-टाईप फायर वॉटर टेंडर्स उभारणीसाठी मे.हायटेक सर्व्हीसेस, पुणे यांची वाटाघाटी अंती कमी करण्यात आलेली रूपये २,१८,७५,०००/- खर्चाची निविदा मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर. तसेच यासाठी लागणाऱ्या १६ जीव्हीडब्ल्यु चेसीस जीईएम पोर्टलवरून खरेदी करण्यासाठी प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

श्री.गजानन बारवाल : यामध्ये पाच अग्निशमन केंद्र करण्याचे ठरवले होते त्याचे काय झाले.

अग्निशमन अधिकारी : जे पाच अग्निशमन केंद्र करणार आहोत त्यासाठी सध्या नगररचना विभागामध्ये जागा उपलब्ध नाही. हर्सुल, एन-९, कांचनवाडी, शहागंज या चार ठिकाणाची जागेसाठी प्रोसेस चालु आहे.

मा.सभापती : डी-मार्ट येथील जागेचे काय झाले?

अग्निशमन अधिकारी : ती सिडकोची जागा असल्यामुळे परवानगी मिळाली नाही. ती जागा प्ले ग्राऊंड साठी आहे.

श्रीमती.राखी देसरडा : सेव्हन हिलच्या अग्निशमन दलाची खुप दुरवस्था झाली आहे. कर्मचाऱ्यांना बसण्यासाठी खुर्च्या नाहीत. आणि तेथील कर्मचाऱ्यांच्या घराची अवस्था खुप वाईट झालेली आहे.

कक्षप्रमुख (दक्षता) : दोन दिवसात स्वतः जाऊन पाहणी करतो.

मा.सभापती : विषय क्र.२१५ मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अग्निशमन विभागासाठी एक्स-टाईप फायर वॉटर टेंडर्स (०५ नग) खरेदी करणेसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.हायटेक सर्व्हीसेस, पुणे यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार त्यांचेकडून र.रू.२,१८,७५,०००/- पर्यंत खरेदी करणेस तसेच यासाठी लागणाऱ्या १६ जीव्हीडब्ल्यु चेसीस जीईएम पोर्टलवरून खरेदी करण्यासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१६ :**

विषय : झोन क्रमांक-५ अंतर्गत पाणी पुरवठा देखभाल दुरूस्तीची कामे करणे बाबत या कामाचे ठेकेदार मे.नुर कन्स्ट्रक्शन यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा म्हणजेच १२.७१ टक्के जास्त दराने म्हणजेच रक्कम रू.२४,५४,३२०/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : Tender ID- 2018-AMCA-365050-1

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) |
| २ | कामाचे स्वरुप | झोन क्रमांक-५ अंतर्गत पाणी पुरवठा देखभाल दुरूस्तीची कामे करणे बाबत. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | पुर्वगणक पत्रक र.रू.२४,५४,३२०/- मान्य झाले आहे. (मा.आयुक्त महोदय यांची मान्यता) |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | रू.२४,५४,३२०/- चे |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | "ई निविदा मार्फत" |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | ०९/११/२०१८ दुपारी ५.०० वा. पर्यंत |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | १२/११/२०१८ दुपारी १०.०० स. वा.पर्यंत |
| ६ | निविदा किती वेळेस मागविल्या | पहिली वेळेस |
| ७ | एकूण किती टेंडर्स/निविदा आली. | १ (एक) |
| ८ | निविदा प्राप्त दर | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.०० टक्के जास्त दराने |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०२. | मे.नुर कन्स्ट्रक्शन (नागसेन कॉलनी औरंगाबाद) | २४,५४,३२०/- | १२.७१ टक्के जास्त दराने (दर वाटाघाटीअंती) |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? असल्यास कारणे नमुद करावीत. | होय<br>बाजारभाव वाढले असल्याने |

| | | |
|---|---|---|
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | देखभाल दुरूस्ती (पाणी पुरवठा) |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | नाही |
| तरी विषयाकिंत काम ठेकेदार मे.नुर कन्स्ट्रक्शन यांचेकडून १२.७१ टक्के जास्त दराने (मा.आयुक्त महोदय यांच्या दालनात झालेल्या दर वाटाघाटी मान्यते नुसार) म्हणजेच टेंडर रक्कम रू.२७,६६,२६४/- पर्यंत करून घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | | |

मा.सभापती : विषय क्र.२१६ मंजूर करण्यांत येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्रमांक-५ अंतर्गत पाणी पुरवठा देखभाल दुरूस्तीची कामे करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारक ठेकेदार मे.नुर कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार त्यांचेकडून सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.७१ टक्के जास्त दराने म्हणजेच रक्कम रू.२७,६६,२६४/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. २१७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.३६ नारेगाव येथील महानगरपालिका शाळेच्या ईमारतीचे वाढीव खोल्या बांधणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१७-२०१८ च्या एस.एस.आर. नुसार रक्कम रू.३६,४६,२३५/- चे तयार करण्यात आले असून या कामाचा खर्च मनपा अर्थसंकल्प सन २०१८-१९ मधील मनपा सर्व शाळा दवाखाने इमारती देखभाल दुरूस्ती या लेखाशिर्षा मधून प्रस्तावित आहे. सदर अंदाजपत्रकास दिनांक ११/०१/२०१९ रोजी मान्यता दिलेली आहे.

तरी, वार्ड क्र.३६ नारेगाव येथील महानगरपालिका शाळेच्या ईमारतीचे वाढीव खोल्या बांधणे या कामाचे रक्कम रूपये ३६,४६,२३५/- चे अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : ऐनवेळीचे विषय क्र.२१७,२१८ मंजुर करण्यांत येतात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३६ नारेगाव येथील महानगरपालिका शाळेच्या ईमारतीचे वाढीव खोल्या बांधणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये ३६,४६,२३५/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१८ :**

विषय : वॉर्ड क्र.९७ लक्ष्मीनगर येथे अंतर्गत सिमेंट कॉंक्रीट रस्ता करणे या कामाचे ठेकेदार श्री.प्रभाकर जी. मोहिते यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रू.२९,८६,२५६.१८/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र.२०१६-AMCA-179698-१४ सन २०१६-२०१७

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता-१ |
| २ | कामाचे स्वरुप | वॉर्ड क्र.९७ लक्ष्मीनगर येथे अंतर्गत सिमेंट कॉंक्रीट रस्ता करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | २९८६२५७.०० |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.२९,८६,२५६.१८ |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | महा-ई-टेंडर |

| | | |
|---|---|---|
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | १४/०७/२०१७ ते १२/०९/२०१७ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | १८/०९/२०१७ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | एक |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | प्रभाकर जी मोहिते | ३४३७४७९.४९ | १५.११ टक्के जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | नविन कॉंक्रीट रस्ते शहरी |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय. |
| तरी विषयांकित प्रकरणी ठेकेदार श्री.प्रभाकर जी. मोहिते यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रू.२९,८६,२५६.१८/- पर्यंत काम करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९७ लक्ष्मीनगर येथे अंतर्गत सिमेंट कॉंक्रीट रस्ता करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारक ठेकेदार श्री.प्रभाकर जी.मोहिते यांचेकडून सदर काम अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रू.२९,८६,२५६.१८/-पर्यंत करून घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिध्दार्थ उद्यान येथील प्राणीसंग्रहालयातील प्राण्यांसाठी जागा कमी असल्यामुळे केंद्रिय प्राणीसंग्रहालय नवी दिल्ली यांनी प्राणीसंग्रहालय हे नवीन मोठ्या जागेत स्थलांतरीत करण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्यानुसार प्राणीसंग्रहालय स्थलांतरीत करणेसाठी पडेगाव मिटमिटा येथील गट क्र.३०७ मधील महाराष्ट्र शासनाच्या महसुल विभागाची १०० एकर जागा प्राणीसंग्रहालय स्थलांतरीत करणेसाठी उपलब्ध करून देण्याकरीता महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्याअनुषंगाने महाराष्ट्र शासनाने प्राणीसंग्रहालय स्थलांतरीत करणेसाठी १०० एकर जागा महानगरपालिकेस प्रदान केली. या जागेवर सफारी पार्क उभारण्याचे प्रस्तावित होते. त्यानुषंगाने पडेगाव मिटमिटा गट क्र.३०७ मधील १०० एकर जागेवर सफारी पार्क उभारणीसाठी मास्टर प्लॅन तयार करणे तसेच सिध्दार्थ उद्यान प्राणीसंग्रहालय येथील मंजुर मास्टर प्लॅनची अमंलबजावणी करणेसाठी ई-टेंडरव्दारे आरएफपी मागविण्यात आलेले होते. प्रथम वेळी चार स्पर्धकांनी भाग घेतला, परंतु या चारही निवीदाकारांनी नमुद कागदपत्रांची पुर्तता न केल्यामुळे दि. १७/१०/२०१८ रोजी फेर-निवीदा मागविण्यात आल्या असता दुस-या वेळी खालीलप्रमाणे तीन एजन्सींचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

१) ब्रिजराज शर्मा ॲण्ड असोसिएट्स प्रा. लि. नवी दिल्ली.
२) ग्रीनप्रो इंडिया, मुंबई.
३) जैन ॲण्ड असोसिएट्स, गुरगाव.

वरिल प्रमाणे प्राप्त तीन एजन्सींचे तांत्रीक कागदपत्रांची छाननी करण्यात आली असता तिन्ही एजन्सींना संपूर्ण आवश्यक असलेले कागदपत्रे दाखल करण्यासाठी सुचना करण्यात आल्यानुसार, कागदपत्रांच्या पुर्ततेअंती दि. १८/१२/२०१८ रोजी मा.आयुक्त-मनपा यांचे दालनात वरील तीनही एजन्सींनी प्रेझेन्टेशन (सादरीकरण) केले. कागदपत्रांची पडताळणी तसेच एजन्सींने सादर केलेल्या प्रेझेन्टेशन अहवालानुसार एजन्सींची कामाची पध्दत, तांत्रिक मुल्यमापन व अनुभवाचे मुल्यमापन इत्यादी तपासणी अंती त्यांना खालील गुण प्राप्त झाले.

| अ.क्र | एजन्सीचे नाव | पैकी | प्राप्त गुण |
|---|---|---|---|
| १ | ब्रिजराज शर्मा ॲण्ड असोसिएट्स प्रा. लि. नवी दिल्ली | १०० | ८५ |
| २ | ग्रीनप्रो इंडिया, मुंबई. | १०० | ६७ |
| ३ | जैन ॲण्ड असोसिएट्स, गुरगाव. | १०० | ६५ |

वरिलप्रमाणे प्राप्त झालेल्या गुणांनुसार आणि ही निवीदा प्रक्रिया क्यु.सि.बी.एस-७०:३० प्रमाणात असल्यामुळे आणि ब्रिजराज शर्मा ॲण्ड असोसिएट्स, नवी दिल्ली यांना ८५ गुण प्राप्त असल्यामुळे आर्थिक (Financial Offer) उघडण्यास ते पात्र ठरले. अ.क्र.२ व ३ या एजन्सींना अनुक्रमे ६७ आणि ६५ गुण प्राप्त झाल्यामुळे आणि पात्रतेसाठी किमान ७० गुण प्राप्त असणे आवश्यक असल्यामुळे या दोन्हीं एजन्सी तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरत नाहीत.

शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग दि.२७/०९/२०१८ मधील परिच्छेद ४.४ नुसार व इतर मार्गदर्शक तत्वानुसार सदर कामाची तातडी व निकड विचारात घेता पात्र ठरलेले एक निविदाधारक ब्रिजराज शर्मा ॲण्ड असोसिएट्स प्रा. लि. नवी दिल्ली यांची आर्थिक ऑफर उघडण्यात आली, त्याचा तपशिल एजन्सीने खालीलप्रमाणे नमुद केला आहे. या बदल तपशिलासह आर.एफ.पी. मधील जोडपत्र ८ नुसार देखील काम करणेस एजन्सीला बंधनकारक राहील.

| FINANCIAL OFFER | | | |
|---|---|---|---|
| **PART** | **PHASE** | **Nature of Services** | **Consultancy Fees** |
| **PART-A** | Preparation of Master Plan for Siddharth Garden zoo and proposed Safari Park & Zoo (at Gut No.307, Mitmita) as its satellite facility. | | **Rs. 29.20 lakhs** |
| **PART-B** | (a) Preparation of animal enclosure designs, including detailed architectural, engineering and technical drawings and detailed estimate etc. considering PWD schedule of rates applicable) | | **(a) @ 3% of total cost of the estimated value of each item of work** |
| | (b) Implementation of the approved Master Plan/s and supervision during execution of works of Siddharth Garden Zoo and Safari Park & Zoo (at Gut No.307, Mitmita) | | **(b) @ 2% of total cost of the estimated value of each item of work** |

वरिलप्रमाणे "भाग-अ" मास्टर प्लॅन तयार करणेसाठी र.रु.२९.२०/- लक्ष आहे. या व्यतिरीक्त "भाग-ब" च्या कामाची रक्कम सर्व नकाशे, डीझाईन, अंदाजपत्रके तयार झाल्यानंतर निश्चित होईल.

वरिल तक्त्यात नमुद प्रमाणे ब्रिजराज शर्मा ॲण्ड असोसिएट्स प्रा. लि. नवी दिल्ली यांनी आर्थिक ऑफर दाखल केली असून दि.०३/०१/२०१९ रोजी एजन्सीचे प्रतिनिधी डॉ.अरविंद चेल यांचे सोबत दराचे संबंधी वाटाघाटी केले असता त्यांनी ऑफर केलेले दर योग्य असल्याबाबत व या एजन्सीला सफारी पार्क व प्राणीसंग्रहालय उभारणीचे कामाचा चांगला अनुभव असल्याबाबत तसेच देण्यात येणाऱ्या सेवेच्या अगदी प्रमाणात व योग्य असल्याचे लेखी कळविले आहे. त्यानुसार सदर आर्थिक ऑफर ही महानगरपालिकेतील निविदा-दर निश्चीती समिती समोर ठेवण्यात आली असता, समितीने वरील तक्त्यातील आर्थिक ऑफरला मंजुरी दिलेली आहे.

करिता सिध्दार्थ उद्यान येथील अस्तीत्वातील प्राणीसंग्रहालय व मिटमिटा येथील प्रस्तावीत सफारी पार्क संबंधीत मास्टर-प्लॅन तयार करणे तसेच या कामासाठी सविस्तर सर्वेक्षण व नियोजन करणे आणि आर्किटेक्चरल, अभियांत्रीकी व तांत्रीक नकाशे, आराखडे, डीझाईन, अंदाजपत्रके, प्रकल्प अहवाल इत्यादी तयार करुन त्यास, सक्षम प्राधीकारी यांचे मान्यतेअंती केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरण यांनी मंजूर केलेल्या मास्टर-प्लॅनची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे आणि चालू कामावर देखरेख इत्यादी सेवा पुरविणेसाठी आणि RFP मधील नमुद केलेल्या कामाच्या व्याप्तीप्रमाणे सर्व कामे पार पाडणेकरीता, वरील तक्त्यातील नमुद ब्रिजराज शर्मा ॲण्ड असोसिएट्स प्रा.लि., नवी दिल्ली यांचे आर्थिक ऑफर/दर मान्यतेचा आणि त्यांना या कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून नियुक्त करणेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

श्री.गजानन बारवाल : याबाबत पीएमसी नेमायचे काय आहे? कोणते काम आहे माहिती देण्यात यावी.

मालमत्ता अधिकारी : सफारी पार्क तयार करण्यासाठी शासनाकडुन गट नं.३०७ मध्ये १०० एकर जागा मिळालेली आहे. त्या जागेवर बांधकामाचे इस्टिमेंन्ट तयार करायचे आहे त्यासाठी निविदा बनवल्या होत्या. पहिल्या वेळेस निविदा बनवली होती तेव्हा चार लोकांनी निविदा सादर केल्या होत्या. परंतु त्यांचे कागदपत्र अपुर्ण असल्यामुळे दुसरी निविदा केली त्यामध्ये तीन एजन्सीने भाग घेतला. १.ब्रिजराज शर्मा ॲण्ड असोसिएट्स प्रा.लि.नवी दिल्ली. २.ग्रीनप्रो इंडिया, मुंबई. ३.जैन ॲण्ड असोसिएट्स, गुरगाव. ही निविदा क्युसिबीसी वर आधारित आहे.या तीन पैकी ब्रिजराज शर्मा ॲण्ड असोसिएट्स प्रा.लि.नवी दिल्ली पात्र ठरलेले आहेत.

मा.सभापती : विषय क्र.२१९ मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिध्दार्थ उद्यान येथील अस्तीत्वातील प्राणीसंग्रहालय व मिटमिटा येथील प्रस्तावीत सफारी पार्क संबंधीत मास्टर-प्लॅन तयार करणे तसेच या कामासाठी सविस्तर सर्वेक्षण व नियोजन करणे आणि आर्किटेक्चरल, अभियांत्रीकी व तांत्रीक नकाशे, आराखडे, डीझाईन, अंदाजपत्रके, प्रकल्प अहवाल इत्यादी तयार करुन त्यास, सक्षम प्राधिकारी यांचे मान्यतेअंती केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरण यांनी मंजूर केलेल्या मास्टर-प्लॅनची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे आणि चालू कामावर देखरेख इत्यादी सेवा पुरविणेसाठी आणि RFP मधील नमुद केलेल्या कामाच्या व्याप्तीप्रमाणे सर्व कामे पार पाडणे या कामाकरीता, प्राप्त झालेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणुन ब्रिजराज शर्मा ॲण्ड असोसिएट्स प्रा.लि., नवी दिल्ली यांचे खालीलप्रमाणे "भाग-अ" मास्टर प्लॅन तयार करणेसाठी आर्थिक ऑफर/दर र.रु. २९.२०/- लक्ष आणि या व्यतिरीक्त "भाग-ब" च्या कामाची रक्कम सर्व नकाशे, डीझाईन, अंदाजपत्रके तयार झाल्यानंतर निश्चित करणेस आणि त्यांना या कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून नियुक्त करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| **FINANCIAL OFFER** | | | |
|---|---|---|---|
| **PART** | **PHASE** | **Nature of Services** | **Consultancy Fees** |
| **PART-A** | Preparation of Master Plan for Siddharth Garden zoo and proposed Safari Park & Zoo (at Gut No.307, Mitmita) as its satellite facility. | | **Rs. 29.20 lakhs** |
| **PART-B** | (a) Preparation of animal enclosure designs, including detailed architectural, engineering and technical drawings and detailed estimate etc. considering PWD schedule of rates applicable) | | **(a) @ 3% of total cost of the estimated value of each item of work** |

| | | |
|---|---|---|
| | (b) Implementation of the approved Master Plan/s and supervision during execution of works of Siddharth Garden Zoo and Safari Park & Zoo (at Gut No.307, Mitmita) | **(b) @ 2% of total cost of the estimated value of each item of work** |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२० :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा ५६ दललली जुन्या जायकवाडी योजनेवर जुने फारोळा पंपगृह असून तेथे ४७५ अ.श. क्षमतेचे ०६ सेन्ट्रीफ्युगल पंप आहेत. त्यापैकी ०४ पंप सन १९७४ मध्ये व ०२ पंप १९८४ मध्ये कार्यान्वीत करण्यात आले आहेत. सदरील पंप कार्यान्वीत करून अनुक्रमे ४४ व ३४ वर्षे झाले आहेत. सदरील पंपींग मशिनरी जुनी झाल्यामुळे पंपींग मशिनरी सुधारण्याच्या दृष्टीने जुना फारोळा पंपगृह येथील एका पंपाचे स्लिपरींग इंडक्शन मोटर व रोटर रेजिस्टन्स स्टार्टर बदलून सध्या बाजारात उपलब्ध असलेली आधुनिक तंत्रज्ञानाची Tatally Enclosed Fan Cooling Motor (TEFC) व Flux Compenseted Magnetic Amplifer Starter (FCMA) खरेदी करून पंप चालविल्यास पंपात वारंवार होणारा बिघाड टाळून एक पंप योग्य पध्दतीने चालविल्या जाईल व वारंवार करावी लागणारी देखभाल दुरूस्ती साधारणतः २ ते ३ वर्ष करण्याची आवश्यकता राहणार नसल्याने वार्षीक दुरूस्ती खर्चात बचत होईल. सदरील केबल खरेदीसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) दरसुची २०१८-१९ नुसार व उर्वरीत कामासाठी अशा प्रकारच्या काम करणाऱ्या एजन्सीकडून दरपत्रके मागवून अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून रक्कम रू.३३,७२,८७१/- खर्च अपेक्षित आहे. करीता वरीलप्रमाणे जुना फारोळा पंपगृह येथील जुने मोटार, स्टार्टर व केबल काढणे व त्या ठिकाणी नवीन पुरवठा करणे, बसविणे व चाचणी देणे या कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कम रू.३३,७२,८७१/- खर्चा बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्र.२२०,२२१,२२२ मंजुर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जुना फारोळा पंपगृह येथील जुने मोटार, स्टार्टर व केबल काढणे व त्या ठिकाणी नवीन पुरवठा करणे, बसविणे व चाचणी देणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.३३,७२,८७१/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२१ :**

विषय : जालना रोडवरील अमरप्रित चौकातील वाहतुक बेटामध्ये मा.शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे शिल्प (म्युरल) तयार करणे या कामाचे ठेकेदार संजीवनी डहाळे यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच निविदा र.रू.२९,२१,३२१/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : निविदा दि.०६/०२/२०१९

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | वार्ड अभियंता कार्यालय क्र.०९ |
| २ | कामाचे स्वरुप | शिल्प (म्युरल) तयार करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | ३२,७१,८७९/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | २९,२१,३२१/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | महा ई निविदेद्वारे व दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्दीद्वारे |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | २८ जानेवारी २०१९ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | ०२ फेब्रुवारी २०१९ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | ०१ |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | संजीवनी डहाळे | २९,२१,३२१/- | अंदाजपत्रकीय दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | पुतळे संगोपन व खरेदी |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | मा.स्थायी समिती सभा दि.१५/१२/२०१८ विषय क्र.१५५ |
| तरी विषयांकित काम ठेकेदार संजीवनी डहाळे यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रू.२९,२१,३२१/- पर्यंत करून घेणेचा व करार करणेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर. | | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जालना रोडवरील अमरप्रित चौकातील वाहतुक बेटामध्ये मा.शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे शिल्प (म्युरल) तयार करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारक ठेकेदार संजीवनी डहाळे यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रू.२९,२१,३२१/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२२ :**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करित आहे उद्यान विभागामार्फत केंद्र शासनाच्या अमृत मिशन अभियानांतर्गत शहरातील विविध खुल्या जागेत हरित क्षेत्र विकसीत करणे या कामाचा सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी मनपाच्या विविध खुल्या जागा उद्याने या ठिकाणी हरित क्षेत्र विकसीत करणेच्या या कामाच्या प्रकल्प सल्लागार यांनी सादर केलेल्या अहवालानूसार शासनाने मंजुरी दिली आहे. सदरील कामाची यापुर्वी निविदा झालेली आहे मात्र काही प्रशासकिय कारणास्तव फेर निविदा कार्यवाही झालेली आहे मात्र शासन निर्णयानूसार जिल्हास्तर, राज्यस्तर व राष्ट्रीयस्तरावरील वर्तमान पत्रात प्रसिध्दी होणे आवश्यक असल्याने सदरील कामाची फेर निविदा कार्यवाही महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदा प्रक्रिये द्वारे करण्यात आली असून सदर निविदेत एकुण आठ निविदाधारकांची दर भरलेले आहे.

या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे दरसुची सन २०१७-१८ नूसार अंदाजपत्रक र.रू.१,६२,६३,६६४/- इतक्या रक्कमेचे काम करुन घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर आय.डी.२०१८-AMCA-374146-१

| | | |
|---|---|---|
| १. | खात्याचे नाव | विभाग प्रमुख, (उद्याने व प्राणी संग्रहालय) |
| २. | कामाचे स्वरुप | केंद्र शासनाच्या अमृत मिशन अभियानंतर्गत शहरातील विविध खुल्या जागेत हरित क्षेत्र विकसीत करणे. |
| ३. | पुर्वगणकपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव? | होय, मा.सर्वसाधारण सभा विषय क्रं.१०५५ दिनांक २०.०५.२०१७ नूसार |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले | मा.आयुक्तांच्या मान्यतेने रक्कम रु.१,६२,६३,६४४/- इतक्या रक्कमेची निविदा मागविण्यात आली. |
| ४. | ज्या वृतपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | ई.निविदा सुचना पत्र दिनांक २०.१२.२०१७<br>ई.निविदा प्रसिध्दी प्रथम सुचना दिनांक १९.०१.२०१८<br>ई.निविदा प्रसिध्द द्वितीय सुचना दिनांक ०२.०४.२०१८<br>ई.निविदा प्रसिध्दी तृतीय सुचना दिनांक ०६.०८.२०१८<br>ई.निविदा प्रसिध्दी चौथी सुचना दिनांक १९.११.२०१८ |
| ५. | अ) टेंडर्स स्विकारण्याची दिनांक | १४.१२.२०१८ |

| | | |
|---|---|---|
| | ब) टेंडर्स उघडण्याचा दिनांक | १७.१२.२०१८ |
| ६. | एकुण किती टेंडर्स आले? | एकुण आठ टेंडर प्राप्त त्याचा तपशिल खालिल प्रमाणे<br>१. स्वप्निल के. घुगे अ.प. दरापेक्षा १८ टक्के कमी दराने<br>२. मे.तेजस सुपरस्ट्रक्चर प्रा.लि. अ.प.दरापेक्षा १८ टक्के कमी दराने<br>३. मे.सहारा कन्स्ट्रक्शन अ.प.दरापेक्षा १७.१० टक्के कमी दराने<br>४. व्हि.टि.पाटील इंजिनिअर्स अण्डॅ कॉन्ट्रक्टर अ.प.दरापेक्षा १०.०९ टक्के कमी दराने<br>५. मे.स्टार कन्स्ट्रक्शन कंपनी अ.प.दरापेक्षा ९.३३ टक्के कमी दराने<br>६. पियूष इन्फोटेक अ.प.दरापेक्षा १.०३ टक्के कमी दराने<br>७. शेळके राजेंद्र भाऊसाहेब अ.प.दरापेक्षा ०.९९ टक्के कमी दराने<br>८. पद्मालया कन्स्ट्रक्शन अ.प.दरापेक्षा ०.६० टक्के कमी दराने<br>वर नमूद नूसार अनुक्रमांक १ व २ चे निविदा दर एक समान आहेत मात्र अनुक्रमांक एकचे निविदाधारक स्वप्निल के. घुगे यांचे निविदेच्या अटिशर्ती नूसार निविदा रक्कमे ऐवढे वर्कडन अपलोड केलेले नव्हते त्यांनी दिनांक ३१/१२/२०१८ रोजी या विभागात लेखी स्वरुपात अर्ज देऊन विनंती केली होती कि, माझ्या कामातील कमी पडणारे वर्कडन मी मा.आयुक्त महोदय यांच्या मान्यतेपुर्वी उद्यान विभागात सादर करिल परंतु त्यांनी उक्त नमूद नूसार कमी पडणारे वर्कडन सादर केले नाही त्यामुळे त्यांची निविदा बाद करण्यात आली व अनुक्रमांक दोनचे निविदाधारक हे पात्र ठरले. |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | मे.तेजस सुपरस्ट्रक्चर, उस्मानाबाद | रू.१,६२,६३,६४४/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.०० टक्के कमी दराने (अठरा टक्के कमी दराने) |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | लागू नाही |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | या योजने अंतर्गत ५० टक्के हिस्सा केंद्र शासन २५ टक्के हिस्सा राज्य शासन व २५ टक्के हिस्सा महानगरपालिका फंडातुन |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | राज्य व केंद्र शासनाची निधी अद्याप अप्राप्त. संचिकेत लेखा विभागाने मनपा हिस्याची निधी उपलब्ध करुन दिली आहे. |
| ९ | सदरचे काम डिपॉझिट मधून करण्यात येणार आहे काय? | या योजने अंतर्गत ५० टक्के हिस्सा केंद्र शासन २५ टक्के हिस्सा राज्य शासन व २५ टक्के हिस्सा महानगरपालिका फंडातुन |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा केली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | लागू नाही |
| १०. | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषयपत्राचा नमूना जोडला आहे? | लागू नाही |
| या विषयांकित कामासाठी ठेकेदार मे.तेजस सुपरस्ट्रक्चर प्रा.लि. उस्मानाबाद यांचेकडुन सदरील काम अंदाजपत्रकिय दरापेक्षा १८.०० टक्के कमी दराने करुन घेणेस्तव व करार करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत प्रस्ताव सादर. | | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, केंद्र शासनाच्या अमृत मिशन अभियानंतर्गत शहरातील विविध खुल्या जागेत हरित क्षेत्र विकसीत करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार मे.तेजस सुपरस्ट्रक्चर प्रा.लि. उस्मानाबाद यांचेकडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा

१८.०० टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.१,६२,६३,६४४/- पर्यंत करुन घेणेस व करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२३ :**

औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे पुंडलिकनगर विभागात मनपाचे आरोग्य केंद्र हे श्री.संजय माणिकराव सरोवर यांच्या मालकीच्या जागेत सुरू असून सदरील आरोग्य केंद्रामार्फत नागरीकांना सर्व प्रकारच्या वैद्यकीय सेवा दिल्या जातात. सदरील आरोग्य केंद्र भाड्याच्या इमारतीत दि.२०/०२/२०१० पासून कार्यरत आहे.

दि.०४/०७/२००९ रोजी संपन्न झालेल्या विषय क्र.३२ (का.प.क्र.०५) नुसार मा.स्थायी समिती सभेने पारीत केलेल्या ठरावानुसार पुंडलिकनगर येथील आरोग्य केंद्रासाठी खाजगी व्यक्तीकडून भाड्याने घेण्यासाठी खाजगी व्यक्ती श्री.संजय पिता माणिकराव सरोवर, यांची मिळकत सर्वे नं.१६/२ पार्ट मधील प्लॉट क्र.४८ व ४९ क्षेत्रफळ १६७ चौ.मी. पैकी १२५.४ एवढ्या जागेस रक्कम रू.७९ प्रति चौ.मी. भाडे रू.१,१८,८७९/- प्रती वर्ष नुसार भाड्याने घेण्यास मा.स्थायी समिती सभेने विषय क्र.३२ नुसार मान्यता दिल्यानुसारच सद्यस्थितीत सदरील इमारत मालकास प्रती माह रू.९,९०६/- इमारत भाडे म्हणुन महानगरपालिकेतर्फे अदा केले जात आहे.

श्री.संजय माणिकराव सरोवर यांनी विभागाने केलेल्या करारनाम्यानुसार प्रत्येक वर्षाला १० टक्के भाडेवाढ द्यावी व थकीत रक्कम अदा करण्याबाबत विभागास अवगत केले आहे. यानुसार दि.२०/०२/११ ते दि.२०/०२/२०१८ या कालावधीत संबंधीत इमारत मालकास रू.४,०८,१९१/- (चार लक्ष आठ हजार एकशे एक्क्यान्नव) अदा करण्याबाबत मागणी केली आहे. सदरील प्रकरणी मालमत्ता विभागाचा अभिप्राय घेतला असता मालमत्ता विभागाकडून आरोग्य विभागामार्फत पुर्वी केलेल्या करारनाम्यानुसार करारनाम्यातील अट क्र.८ नुसार प्रती वर्षी १० टक्के भाडेवाढ अनुज्ञेय असल्याबाबत अभिप्राय दिलेला आहे.

तसेच मनपाच्या इमारती भाडेतत्वावर देण्याच्या करारनाम्यानुसार १० टक्के भाडे वाढीनुसार वसुली करण्यात येते. करीता खाजगी इमारत धारकासही पूर्वी केलेल्या करारनाम्यानुसार प्रती वर्षी १० टक्के भाडेवाढ करून फरकाची रक्कम अनुज्ञेय असल्याबाबत मालमत्ता विभागाने संचिकेत अभिप्राय दिलेला आहे.

करीता विभागाने केलेल्या करारनाम्यानुसार प्रत्येक वर्षी १० टक्के भाडेवाढ व थकीत रक्कम दि.२०/०२/२०११ ते २०/०२/२०१८ पर्यंत थकीत र.रू.४,०८,१९१/- (चार लक्ष आठ हजार एकशे एक्क्यान्नव फक्त) तसेच पूढे जी भाडेवाढ होईल, ती प्रतीमाह संबंधीत इमारत मालकास अदा करण्याबाबत तसेच मनपाची इमारत उपलब्ध होईपर्यंत सध्याची जागा आरोग्य केंद्रासाठी वापरण्यास व प्रस्तावित केल्याप्रमाणे भाडेवाढ संबंधीत इमारत मालकास द्यावी किंवा कसे? करीता सदरील प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

श्री.गजानन बारवाल : श्री.विजय वाघमारे यांची जागा भाडेतत्वावर शाळेसाठी घेतलेली आहे. त्यांचे भाडे थकीत आहेत ते कधी पर्यंत देणार आहे.

शिक्षणाधिकारी : चार दिवसात चेक देण्यात येईल.

मा.सभापती : विषय क्र.२२३ मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेतर्फे पुंडलिकनगर विभागात महानगरपालिकेचे आरोग्य केंद्रासाठी भाडेतत्वावर घेण्यांत आलेल्या श्री.संजय माणिकराव सरोवर यांच्या मालकीच्या जागेचे करारनाम्यानुसार प्रत्येक वर्षी १० टक्के भाडेवाढ व थकीत रक्कम दि.२०/०२/२०११ ते २०/०२/२०१८ पर्यंत थकीत रक्कम रू.४,०८,१९१/- (चार लक्ष आठ हजार एकशे एक्क्यान्नव रूपये फक्त) तसेच पूढे जी भाडेवाढ होईल, ती प्रतीमाह संबंधीत इमारत मालकास अदा करण्यास तसेच मनपाची इमारत उपलब्ध होईपर्यंत सध्याची जागा आरोग्य केंद्रासाठी वापरण्यास व प्रस्तावित केल्याप्रमाणे भाडेवाढ संबंधीत इमारत मालकास देणेसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगीताने सभा संपन्न झाल्याचे मा.सभापती यांनी जाहीर केले.

**दिलीप सुर्यवंशी**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद